# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे संवर्धन व जतन करण्याबाबत

**(१) ३५४०३ (१०-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांची दुरवस्था झाली असून याबाबत गड-किल्ले प्रेमींकडून नेहमीच याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध जिल्ह्यात ऐतिहासिक महत्त्व असलेले एकूण किती गड व किल्ले आहेत व त्या गड-किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाकरिता शासनाकडून प्रतिवर्ष किती निधी मंजूर करण्यात येतो आणि त्यातून गड किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाबाबतची कोणकोणती कामे केली जातात,

(३) असल्यास, राज्यातील गड किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत लोकप्रतिनिधींनी सिंधुदुर्ग (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) किल्याच्या पाहणी दौऱ्यात गडकिल्ले पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत कोणकोणत्या सूचना केल्या होत्या व त्याअनुषंगाने आजवर कोणकोणती कामे करण्यात आली आहेत, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) राज्यातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे योग्य ते संवर्धन व जतन करण्याकरिता तसेच दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक ऐतिहासिक गड-किल्ल्यांकरिता ठराविक निधीची तरतूद करून या गड-किल्ल्यांच्या ठिकाणी गड-किल्ले प्रेमी तसेच पर्यटकांकरिता सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासन काही धोरण निश्चित करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य संरक्षित गड किल्ल्याचे निधी उपलब्धतेनुसार जतन व संवर्धन करण्यात येते.

(२) महाराष्ट्रात सुमारे ४५० किल्ले आहेत. त्यापैकी ४९ किल्ले राष्ट्रीय संरक्षित असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, भारत सरकार यांच्या अखत्यारीत आहेत व ६० किल्ले राज्य संरक्षित असून ते महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. मागील ५ वर्षामध्ये राज्य संरक्षित किल्ल्यांच्या जतन दुरुस्तीकरीता शासनाने प्रतिवर्षी सरासरी रु.२२.६२ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे. यामध्ये किल्ल्यांची तटबंदी, बुरुज, पायवाटा, दगडी पायऱ्या व किल्ल्यातील वास्तु अवशेषांचे जतन व दुरुस्ती करण्यात येते.

(३) सिंधुदुर्ग किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत असून सदर किल्ल्याच्या जतन व संवर्धनाची कामे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत करण्यात येतात. तसेच ग्राम पंचायत वायरी भूतनाथ, ता.मालवण यांनी सिंधुदूर्ग किल्ला येथे भेट देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी खालीलप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

१. शौचालय व्यवस्था

२. नियमित किल्ला परिसर स्वच्छता

३. कचराकुंडी

४. दरवर्षी किल्ल्यावरील विहीरींचा गाळ काढून गोड्या पाण्याचे संवर्धन करणे

५. पाझर तलावाची कामे

६. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
७.किल्ल्याच्या ठिकाणी दिवाबत्तीची सोय केलेली आहे.
तसेच निधी उपलब्धतेनुसार किल्ल्याची देखभाल दुरुस्ती,पदपथ, सांस्कृतिक सूचना फलक, शौचालय कक्ष इत्यादी कामे करण्यात येत आहेत.
(४) राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी जिल्हा वाषिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२३-२४ पासून पुढील तीन वर्षासाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्याचे शासनाने धोरण निश्चित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुबंईतील जोगेश्वरी येथील प्राचीन व इतिहासकालीन पुरातन वास्तुचे सौंदर्यीकरण करण्याबाबत**

**(२) ४२३९६ (२४-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील गुंफा या प्राचीन व इतिहासकालीन पुरातन वास्तु असून याची देखभाल दुरूस्ती अभावी दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जोगेश्वरी गुंफेच्या परिसरातील बांधकामे निष्कासित करताना निर्माण होणारे डेब्रीज हे तेथून वेळेवर उचलून या ठिकाणी उद्यान विकसित करण्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रतिज्ञापत्राद्वारे मा.न्यायालयात सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदरहू गुंफेचे व तेथील परिसराचे सौंदर्यीकरण व सक्षमीकरण करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन सादर केलेल्या निवेदनात कोणकोणती व किती कामे करण्याबाबत नमूद केले आहे तसेच त्याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, उक्त गुंफेच्या परिसरात उद्यान विकसित करणे तसेच या परिसराचे सौदर्यीकरण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०७-२०२३) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
प्रश्नाधीन वास्तू भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत येत असून त्यांचेमार्फत वास्तूचे जतन व संवर्धन करण्यात येते.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
सदर उद्यान विकसित करण्याबाबत नगर विकास विभागाने प्रतिज्ञापत्र मा.न्यायालयात सादर केलेले आहे. तथापि जोगेश्वरी गुंफेच्या परिसरातील पात्र झोपडीधारकांचे बांधकामे निष्कासन कारवाई करण्याकरीता कंत्राटदार नियुक्त करण्यात आलेला असून सदर मलबा (डेब्रीज) उचलण्याचे काम काही प्रमाणात करण्यात आलेले असून उर्वरीत काम चालू आहे.
(३) दि.१२.१.२०२१ रोजी मा. लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले असून त्यात एकूण १६ कामे करण्याचे नमूद केले आहे. जोगेश्वरी गुंफेच्या प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण, प्रवेशद्वाराजवळील तसेच गुंफेच्या आतील व बाहेरील शिल्पाचे सुशोभिकरण, गुंफेच्या आतील डागडुजीचे कामाचे नुतनीकरण, गटारांची व सांडपाण्याची योग्य निगा राखणे, गुंफेच्या आत प्रकाशयोजना करणे, शिल्पांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणे, गुफेच्या सभोवती कुंपण करणे, गुफा प्रवेशद्वाराजवळ दीपमाळ लावणे, माहिती व दिशादर्शक फलक लावणे, गुफेकडे येणारे रस्ते सुरक्षित व वाहतुकीस सक्षम करणे, गुंफा परिसरात पर्यटकांना आवश्यक अशा पायाभूत सुविधा उदा. प्रसाधनगृह, पाणपोई, वाहनतळ, कचराकुंड्या इ.उभारणे, परिसराचे सुशोभिकरण करणे इत्यादी.
(४) सदर गुफेच्या लगतचा भूभाग भारतीय पुरातत्व विभाग व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून संपादित करणे बाकी आहे. त्यामुळे सद्यस्थितीत या परिसराचे सौदर्यीकरण करता येणे शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीरींच्या मंजुरीच्या किंमतीत वाढ करण्याबाबत

**(३) ४८४२९ (३०-१०-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीची मंजूरीची किंमत सन २०१२ या कालावधीत तीन लक्ष करण्यात आलेली असून साहित्य, वाळू, सीमेंट, खडी यांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे वैयक्तिक सिंचन विहीरींच्या मंजुरीच्या किंमतीत वाढ करण्याबाबत औसा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश तत्कालीन रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधितांस दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मा.विधानसभा सदस्य यांचे दि.३/०३/२०२२ चे संबंधित विषयाबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रावर उचित कार्यवाही करण्याबाबत निदेश देण्यात आले.

३) विभागाच्या शासन निर्णय क्र.मग्रारो २०२१/ प्र.क्र.१८२/मग्रारो-०१, दि.४/११/२०२२ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीची कमाल मर्यादा रु.३.०० लक्ष वरुन रु.४.०० लक्ष करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ऐतिहासिक सायन किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत

**(४) ४९५१० (२६-१२-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर्वात उंच ४०० वर्षे जुन्या ऐतिहासिक सायन किल्ल्याचे बुरूज ढासळत असून भिंती कोसळल्या आहेत तसेच मुख्य बांधकाम जीर्ण अवस्थेत असल्याने किल्ल्याची डागडुजी करून ऐतिहासिक ठेवा जतन करण्याची मागणी स्थानिक आणि पर्यावरणप्रेमी यांनी केली असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ल्याच्या आजूबाजूला सुरु असणाऱ्या विकासकामांमुळे किल्ल्याच्या सीमा संरक्षण भिंतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सायन किल्ल्याचा डागडुगीचा आराखडा बनविण्यात आला असून किल्ल्याची डागडुजी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची निविदा प्रक्रिया कधीपर्यंत राबविण्यात येणार आहे तसेच उक्त किल्ल्याच्या संवर्धनाच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
प्रश्नाधीन किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, मुंबई मंडळ यांचे अखत्यारीत असून सन २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे किल्ल्याचा बुरुज ढासळला आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्नाधीन किल्ल्याच्या बुरुजाच्या दुरुस्तीसाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, मुंबई मंडळामार्फत रू.६२,४५,७७१/- इतक्या रकमेचा आराखडा तयार करण्यात आला असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील शासनाची प्राणीसंपदा गुजरातमध्ये स्थलांतरित केल्याबाबत**

**(५) ४९७६२ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातानील हत्तीकॅम्प (जि.गडचिरोली) येथील वन विभागाच्या तीन हत्तींचे गुजरातमध्ये रिलायन्स उद्योग समूहाद्वारे संचलित राधाकृष्ण वेल्फेअर संस्था जामनगर येथे दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक विरोध झुगारुन स्थलांतर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच यापूर्वी ताडोबा (जि.चंद्रपूर) अंधारी व्याघ्र प्रकल्पामधील सहा हत्ती जामनगर येथे दिनांक २० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) त्याचप्रमाणे कमलापूर (जि.गडचिरोली) येथील हत्तींचे स्थलांतर करु नये यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक ९ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास गडचिरोली सीसीएफ कार्यालयासमोर तीव्र स्वरुपात आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाचे स्थलांतरीत केलेले हत्ती महाराष्ट्रात परत आणण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील राज्य सरकारची प्राणीसंपदा गुजरातमध्ये स्थलांतरित केल्याप्रकरणी तसेच प्रश्न भाग (३) अन्वये चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) व (२) दिनांक ०२.०९.२०२२ रोजी गडचिरोली जिल्ह्यातील पातानिल येथील ३ हत्ती व दिनांक १९.०५.२०२२ रोजी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामधील ४ नर व २ मादी असे एकूण ९ हत्तींना हत्ती प्रकल्प विभाग, पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार आणि केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण यांचे पूर्वपरवानगीने राधे कृष्ण टेंपल एलिफंट ट्रस्ट, जि. जामनगर, गुजरात येथील बचाव केंद्रात पाठविण्यात आले आहे.
(३) वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालयावर दिनांक ०८.०९.२०२२ रोजी स्थानिक ग्रामस्थांनी कमलापूर येथील हत्ती कॅम्प मधील हत्ती स्थलांतरीत करु नये यासाठी मोर्चा आणून निवेदन दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) राज्यात वनविभागाकडील पाळीव हत्तींना जामनगर येथील राधाकृष्ण एलिफंट वेल्फेअर चैरीटेबल ट्रस्ट, गुजरात येथे पाठविण्याचा निर्णय त्यांची देखभाल व उर्वरित आयुष्यात उत्तम उपचाराची सेवा सुनिश्चित करण्यासाठी दिर्घकालीन विचार करुन घेण्यात आला होता व गडचिरोली जिल्ह्यातील पातानिल हत्ती कॅम्प मधील हत्ती व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील हत्ती, हत्ती प्रकल्प विभाग, पर्यावरण, वन व वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार आणि केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली व राज्य शासनाच्या पूर्व परवानीने स्थालांतरीत करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) येथे आहुपे खोऱ्यात रानगव्यांमुळे भातशेती आणि इतर शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(६) ४९८४३ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) येथे आदिवासी भागात आहुपे खोऱ्यात रानगव्यांचा मुक्त संचार वाढल्यामुळे भातशेती आणि इतर शेतमालाचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कृषी विभागातून करण्यात आलेले पंचनामे वन विभागास प्राप्त झाले आहेत काय, पंचनाम्यानुसार एकूण नुकसानीचा तपशील काय आहे, तसेच नुकसानग्रस्तांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी रानगव्यांच्या मुक्त संचाराला आळा घालण्याबाबत शासनाने कोणत्या उपापयोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गिधाडांच्या संवर्धनासाठी उपाययोजना करुन अंमलबजावणी करण्याबाबत**

**(७) ५००७० (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मेळघाट, पेंच व गडचिरोली जिल्ह्याचा काही भाग वगळता राज्यात गिधाड पक्षी ग्रामीण भागासह वन क्षेत्रात आढळून येत होते, मात्र माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गिधाडे दिसून येत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्याच्या वन विभागाने गिधाडांच्या संवर्धनासाठी योजना तयार केली असून त्यानुसार गिधाड प्रजनन केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने या पक्षांसाठी सुरक्षित ठिकाणे घोषित करणे गरजेचे असून त्यासाठी वन विभागाने ग्रामस्तरावर बैठक घेण्याबाबत मुंबई प्राकृतिक इतिहास सोसायटी (बॉम्बे नॅचरल हिस्ट्री) या संस्थेने सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने योग्य अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) देशात एकूण ९ प्रकारचे स्थानिक तसेच स्थलांतरीत गिधाड पक्षी आढळून येतात. त्यापैकी ५ प्रकारचे गिधाड पक्षी महाराष्ट्रात आढळून येतात.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या संरक्षित क्षेत्रामध्ये गिधाडांची अंदाजे संख्या ४० ते ५० आहे. गडचिरोली वनवृत्तांतर्गत गडचिरोली, भामरागड व सिरोंचा या तीन विभागाचे वनक्षेत्रात १३ ठिकाणी अंदाजे ३७५ गिधाडे आढळून येतात. नाशिक वनवृत्तातील पश्चिम भाग नाशिक वनविभागातील हरसुल, पेठ, त्र्यंबक, नाशिक वनपरिक्षेत्रात गिधाडांची अंदाजे संख्या ४७५ ते ५९५ आहे. तसेच ठाणे वनवृत्तामधील रायगड जिल्ह्यातील रोहा वनविभागातील म्हसळा व श्रीवर्धन वनपरिक्षेत्रात सन २०२१-२२ मध्ये गिधाडांची अंदाजे संख्या १५२ इतकी आहे

(२) देशातील गिधाड संवर्धनाबाबत सन २०२०-२०२५ करीता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात नाशिक जिल्ह्यातील मौजे अंजनेरी येथे गिधाड संवर्धन प्रजनन केंद्राची स्थापना करणे प्रस्तावित आहे.

(३) महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नागपूर, नाशिक व गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये गिधाडांचे अस्तित्व आढळून येते. या क्षेत्रामध्ये गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने विविध संस्था जसे की इला फाऊंडेशन सोसायटी, पुणे, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई यांचेमार्फत संशोधन प्रकल्प राबविण्यात येतात.

(४) गिधाड पक्ष्याच्या संवर्धनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जागतीक वन दिन, जागतिक पर्यावरण दिन व वन्यजीव सप्ताहामध्ये पाळीव प्राण्यांवर डायक्लोफेनेक या औषधीचे वापरास आळा घालण्यासाठी जनजागृती करण्यात येते.
- प्रत्येक वर्षी माहे सप्टेंबरच्या पहिल्या शनिवारी राज्य स्तरावर जागतिक गिधाड संवर्धन जनजागृती दिवस साजरा केला जातो.
- गिधाडांची घरटी असलेल्या जागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येते.
- गिधाडांना मृत जनावर खाताना पाळीव प्राणी जसे कुत्र्यांपासून त्रास होणार नाही यासाठी Vulture Restaurant व मचाणी तयार करण्यात आलेले आहेत.
- गावातील मृत पाळीव प्राण्यांची पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून तपासणी करुन सदर मृत जनावर Vulture Restaurant व मचाणीवर गिधाडांच्या खाद्यांसाठी (Diclofenac प्रभावित नसलेल्या पाळीव प्राण्यांचे मृत शरीर) दिले जाते. त्यासाठी जनावराचे मालकास रु. ५००/- प्रति मृत जनावर प्रमाणे देण्यात येतात.
- गिधाड वास्तव्य असलेल्या क्षेत्रात नियमितपणे परिक्षेत्रातील अधिनस्त कर्मचारी गस्त करतात.
- स्थानिक लोकांमधून गिधाड मित्र म्हणुन नेमण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील पांढरवाणी व बोईकला शिवारातील वाघांचा बंदोबस्त करण्याबाबत

**(८) ५१४९२ (१९-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :**
सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पांढरवाणी व बोईकला शिवारात एका वाघाचा मुक्त संचार सुरु असल्याने वाघाच्या दहशतीमुळे येथील शेतकरी त्रस्त झाल्याने या वाघाचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी करीत असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी स्थानिक वन कर्मचाऱ्यांकडे तक्रार केली असता, वन कर्मचाऱ्यांकडून उद्धटपणे वागणूक दिल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन वाघाचा बंदोबस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०२३) :** (१) नागपूर यथील पांढरवाणी व बोईकाला शिवाराच्या परिसरात दिनांक १०.१०.२०२२ रोजी दुरध्वनीद्वारे वाघ दिसल्याचे प्राप्त माहितीनुसार क्षेत्रीय कर्मचारी व गावातील नागरीक यांचे समवेत वाघ असलेल्या परिसरात वाघाचा शोध घेण्याकरीता गस्त करण्यात आली. मात्र वाघ निदर्शनास आला नाही. तसेच सदचे परीसरात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले व पाऊलखुणांचा शोध घेण्यात आला. परंतु कॅमेरा ट्रॅपमध्ये तसेच पाऊलखूणाबाबत कोणतेही भौतिक पुरावे आढळून आले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) तथापि, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्याकरीता वनविभागामार्फत स्थानिक लोकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, कॅमेरा ट्रॅप लावून वाघ असल्याची खात्री करणे, नियमित गस्त करुन पाऊलखूणांचा शोध घेणे, Door to Door जावुन Campaign या सारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देशातील पहिली सर्पविष पेढी (व्हेनम बँक) आणि परीक्षण केंद्र राज्यात उभे करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(९) ५२०७७ (२३-०१-२०२३). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतातील सर्वाधिक सर्पदंश मृत्यू महाराष्ट्रात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्पदंशाने होणारे मृत्यू कमी करण्याकरिता देशातील पहिली सर्पविष पेढी (व्हेनम बँक) आणि परीक्षण केंद्र राज्यात उभे करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरहू केंद्र उभारण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, सदरहू केंद्राची उभारणी करण्याबाबत शासनाने नियोजन केले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील सर्पदशांच्या घटना व त्यामुळे होणाऱ्या मृत्युच्या घटनांचे विश्लेषण करुन अभ्यास करणे, राज्यामध्ये Anti-Snake Venom Serum (ASVS) च्या आवश्यकतेबाबत अभ्यास करणे व त्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याकरिता सुचना करणे आणि राज्यामध्ये सर्पविष तपासणी केंद्र तसेच सर्पविष Repository / Bank स्थापित करण्याची पडताळणी करणेकरीता दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भोर (जि.पुणे) तालुक्यातील विविध ठिकाणी तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

**(१०) ५२३७४ (२९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील विविध ठिकाणी तलाठी कार्यालयासाठी तसेच आंबवडे, मौजे पानशेत, मौजे पौड, मौजे पिरंगुट, मौजे ताथवडे, मौजे घोटावडे, मौजे अंबवणे या ठिकाणी मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे आवश्यक असून त्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त कार्यालयाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय तसेच सदरचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) भोर, (जि.पुणे) तालुक्यातील प्राप्त इमारत बांधकाम प्रस्तावांपैकी कामाची निकड व सन २०२३-२४ मधील निधीची उपलब्धता विचारात घेऊन ०५ मंडळ अधिकारी २० तलाठी कार्यालय इमारतीच्या बांधकामांना महसूल व वन विभाग, शासन निर्णय,दिनांक १४/०७/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मसलगा (ता.निलंगा, जि.लातूर) तलावात आढळलेल्या दुर्मिळ रंगीत करकोचा (Painted Stork) पक्ष्याच्या वसाहतीचे संवर्धन करण्याबाबत

**(११) ५२४३५ (२४-०१-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मसलगा (ता.निलंगा, जि.लातूर) तलावाच्या पाणथळ क्षेत्रात पहिल्यांदाच ४०० पेक्षा अधिक रंगीत करकोचा (Painted Stork) पक्ष्यांची वसाहत माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दुर्मिळ पक्षी, पिल्ले व घरट्यांची राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, वनविभाग व स्थानिक जैवविविधता समितीने पाहणी करुन त्याची गणना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पक्ष्यांनी निवडलेला हंगामी अधिवास, नैसर्गिक खाद्याची उपलब्धता, प्रजनन सुलभता याचा शास्त्रोक्त अभ्यास करुन त्याचे जतन संवर्धन करणे गरजेचे असल्याचे उपरोक्त संस्था व समितीचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे जतन, संवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०७-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.
उस्मानाबाद वन विभागातील लातूर जिल्ह्यातील वन परिक्षेत्र वि.का. लातूर अंतर्गत मसलगा ता. निलंगा येथील पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या तलावाच्या पाणथळ क्षेत्रात रंगीत करकोचे (Painted Stork) पक्षी आढळून आले.
(२) बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी सदस्य यांचेसमवेत उस्मानाबाद वन विभागाचे स्थानिक अधिकारी / कर्मचारी रंगीत करकोचे (Painted Stork) पक्षांचे पाहणी केली. त्याठीकाणी रंगीत करकोचे (Painted Stork) यांचा अधिवास आढळून आला असून याबाबत कोणतीही प्रत्यक्ष गणगा करण्यात आलेली नाही.
(३) व (४) सदर तलाव पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित असून, जमीन ही गाळपेऱ्याची आहे. त्याठिकाणी रंगीत करकोचे (Painted Stork) पक्षी झाडवर अधिवास करीत असल्याचे पाहणीमध्ये आढळून आले होते. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी या संस्थेकडून याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे जतन, संवर्धन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात भूमी अभिलेख कार्यालयात होत असलेला गैरव्यवहार**

**(१२) ५४०७६ (२९-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूमी अभिलेख कार्यालयाच्या अंतर्गत मोजणीच्या नावाने तारखा देणे, मोजणी करणे, पैसे न दिल्यास मोजणी न करता मागे येणे, पैसे घेऊन खुणा दाखवणे व मोजणीचे नकाशे देणे या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरु असून नागरिकांकडून गैर मार्गाने पैसे वसूल करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात भूमी अभिलेख कार्यालयात मोजणी करण्यासाठी किती प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच जमीन प्लॉट मोजणीची प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमीन धारकांना तात्काळ मोजणी उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या तसेच उप अधीक्षक भूमी अभिलेख तसेच अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील गैरव्यवहार करणाऱ्या लोकसेवकांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

भूमि अभिलेख विभागात, दि. १/१/२०१२ पासून जमीन मोजणी बाबत हस्तलिखीत मोजणी नोंदवह्या बंद करुन ई-मोजणी आज्ञावली विकसीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख व नगर भूमापन अधिकारी कार्यालयाकडे जमीन / मिळकत धारकांकडून मोजणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची ई-मोजणी आज्ञावलीमध्ये नोंदणी करणेत येते. नोंदणीअंती संबंधितांना ई- मोजणी आज्ञावलीमधुन मोजणी फी चे चलन पारीत केले जाते. भरणा केलेले चलन प्राप्त झाल्यानंतर ई-मोजणी आज्ञावलीद्वारे संबंधितांना मोजणीची नोटीस / तारीख कळविण्यात येते.

नैसर्गीक व प्रशासकीय कारणास्तव मोजणी काम झाले नाही तर ई-मोजणी आज्ञावलीद्वारे नियोजनात बदल करुन नव्याने मोजणी तारीख नेमण्यात येते.

अर्जदार गैरहजर, अर्जदाराची विनंती, वहिवाट माहित नसणे इ. कारणास्तव पुन्हा भेट देवून मोजणी काम करावयाचे असल्यास ई-मोजणी आज्ञावलीद्वारे पुनर्भेट फी चलन पारीत केले जाते. त्यानुसार फेरमोजणी तारीख नेमणेत येवून मोजणी काम करणेत येवून कार्यालयीन तपासणीअंती संबंधितांना नकाशाची “ क” प्रत पुरविण्यात येते.

(२) राज्यात माहे जून २०२३ अखेर सर्व प्रकारची एकूण १,१५,५३८ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. रिक्त पदे तसेच अभिलेखांचे स्कॅनिंग करणे, भूमापन नकाशाचे डिजीटायझेशन, e-PICS, कोलाबलॅंड व ड्रोनद्वारे गावठाण मोजणीची कामे या कारणास्तव प्रलंबित आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सर्व प्रलंबित मोजणी प्रकरणे निपटारा करणेकरीता, आवश्यक त्या उपाययोजना, तसेच भूकरमापकास मदतनिस म्हणून नेमणूक करणेकामी संबंधित उपसंचालक भूमि अभिलेख व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, प्रलंबित मोजणी प्रकरणे जलद गतीने निकाली होणेसाठी ETS व Rover उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच कोणतेही मोजणी प्रकरण ९० दिवासात निकाली करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे.

शेतकरी / नागरीकांकडून गैरव्यवहाराबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास सदर तक्रारीबाबत चौकशीत गैरप्रकार किंवा अनियमितता आढळल्यास संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्याविरूद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या प्रलंबित अर्जाच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(१३) ५४२२२ (२९-०१-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या प्रलंबित अर्जाची संख्या सातत्याने वाढत असून सद्यस्थितीत ही संख्या हजार झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्ज निकाली काढण्याकरिता दिनांक १७ सप्टेबंर ते २ ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सेवा पंधरवाडयामध्ये नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयातील किती प्रकरणाचा निपटारा करण्यात आलेला आहे व किती प्रकरणे रद्द करण्यात आलेली आहेत तसेच शिल्लक राहिलेल्या प्रकरणाचा निपटारा तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१), (२), व (३) शासन पत्र दिनांक १२.०९.२०२२ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेमार्फत दिनांक १७.०९.२०२२ ते ०२.१०.२०२२ या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला होता.

सदर पंधरवड्यामध्ये जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात २३१२८० प्रकरणे निकाली काढण्यात आले असून सद्य:स्थितीत ८ प्रकरणे प्रलंबीत आहेत. तसेच कोणतेही प्रकरण रद्द करण्यात आलेले नाही.

प्रलंबीत प्रकरणात त्रुटींची पुर्तता करून अर्ज निकाली काढण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यातील सिंचन विहिरींच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत

**(१४) ५४६६५ (२४-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सिंचन विहिरींना दोन वर्षात मंजुरी देण्यात आले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात एकूण १३७०० सिंचन विहिरींचे प्रस्ताव संबंधित विभागाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सिंचन विहिरींच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०७-२०२३) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

धुळे जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींचे ११११६२ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ६६४ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आलेली आहे. पात्र प्रस्तावांची संख्या ५८५८ असून २८८४ प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या आहेत. तसेच १७५६ प्रलंबित प्रस्ताव आहेत. दिनांक ०४.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये सुधारित निकषांच्या अनुषंगाने या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंडाळे (ता.कराड, जि.सातारा) येथे बिबट्याचा पाळीव प्राण्यांवर होत असलेले हल्ले**

**(१५) ५४७८३ (२९-०१-२०२३). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंडाळे (ता.कराड, जि.सातारा) येथील दक्षिण विधानसभा मतदारसंघामध्ये डोंगरी भागामध्ये बिबट्याचा वावर वाढला असून पाळीव प्राण्यावर होणाऱ्या हल्ल्यांमुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात शेतकरी व ग्रामस्थांना बिबट्या व पिल्ले दिसत असल्याने त्यांच्याकडून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) उंडाळे हे गाव कराड वनपरिक्षेत्रातील कासारशिरंबे व म्हासोली या दोन नियतक्षेत्रामध्ये येते. सदर २ नियतक्षेत्रामध्ये एकुण २१ गावे असून या गावांमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात पशुधन हानीच्या सन २०२१-२२ मध्ये २८ व सन २०२२-२३ मध्ये २७ घटना निदर्शनास आल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणांमध्ये संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस अनुक्रमे रु. २,३२,१५०/- व रु. २,५४,५१२/- असे एकूण रु. ४,८६,६६२/- इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) मानव-बिबट संघर्षाच्या घटना घडल्यानंतर बिबट या वन्यप्राण्यास जेरबंद करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांमार्फत करण्यात येते हे खरे आहे.

(३) मानव-बिबट संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपायायोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांमुळे शेतपिकांचे, पशुधनांचे नुकसान झाल्यास अथवा मनुष्य जखमी / मृत्युच्या घटना झाल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यानी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उपलब्ध असलेल्या २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत सन २०२३-२४ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेला संपुर्ण रु. ७०.०० कोटी निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BDS) वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
- बिबटप्रवण क्षेत्रात वनकर्मचाऱ्यांमार्फत नियमित गस्त घालून लगतच्या क्षेत्रातील ग्रामस्थांचे जनजागृतीद्वारे प्रबोधन करण्यात येते.
- वन्यप्राण्यांमुळे मानवी जिवितास धोका उद्भवल्यास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- बिबटप्रवण क्षेत्रात दवंडी देणे, परिपत्रके, भित्तीपत्रके अशा पध्दतीचा वापर करुन बिबट या वन्यप्राण्यांबाबत स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.
- पाळीव प्राणी बंद गोठ्यात बांधण्याबाबत ग्रामस्थांना सुचना दिल्या जातात.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठे, वनतळी व चेकडॅमची निर्मिती करुन त्यात बारमाही पाणी उपलब्ध होईल याची खातरजमा करण्यात येते.
- स्थानिक लोकांच्या सहभागातून जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड ) येथे अतिरिक्त तलाठी सज्जावर संगणक व प्रिंटर उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१६) ५४८८२ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथे अतिरिक्त तलाठी सज्जावर संगणक व प्रिंटर उपलब्ध नाहीत त्यामुळे तलाठी यांना दैनंदिन कामकाज करणे अत्यंत कठीण झाले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने किती गावात संगणक व प्रिंटर उपलब्ध करून दिले आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेश दि. १३.११.२०१८ अन्वये केज तालुक्यासाठी एकूण ३९ लॅपटॉप व प्रिंटर उपलब्ध करुन देण्यात आलेले असून उपलब्ध लॅपटॉप व प्रिंटरवर दैनंदिन कामकाज सुरु आहे. आज रोजी केज तालुक्यात सज्जा पुनर्रचना करण्यात आलेली असून, नवीन पुनर्रचनेनुसार एकुण ५३ तलाठी सज्जे व ९ महसुल मंडळ तयार करण्यात आलेले आहेत. नवीन पुनर्रचनेप्रमाणे केज तालुक्यासाठी केलेल्या मागणीनुसार लॅपटॉप व प्रिंटर पुरविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा किरमिटी (जि.नागपूर) येथील हिंगणा तहसील अंतर्गत किरमिटी भरकस येथील उपविभागीय अधिका-यांना अधिकार नसतांना नकाशा मंजुर केल्याबाबत**

**(१७) ५५०१७ (२९-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा किरमिटी भरकस (जि.नागपूर) येथील हिंगणा तहसील अंतर्गत सन २०२० मध्ये उपविभागीय अधिकारी यांनी नकाशा मंजुर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून उपविभागीय अधिका-यांना अधिकार नसतांना नकाशा मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास सदर प्रकरणी दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे करणार आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१), (२) व (३) उप विभागीय अधिकारी नागपूर (ग्रामीण) यांनी नकाशा मंजूर केल्याबाबतच्या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी, नागपूर यांनी चौकशी केलेली असून त्यानुसार सदर जमीनीचे रेखांकन मंजूरीचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एरंडोल (जि. जळगांव )येथील ऐतिहासिक पांडव वाडयांचे जतन दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत**

**(१८) ५५५५९ (२९-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल (जि. जळगांव) येथील ऐतिहासिक पांडव वाडयांचे जतन दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सहा.संचालक पुरातत्व विभाग, नाशिक यांना संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास आदेशित करुनही अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही करून सदर अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत काय व त्यात किती निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त कामाला केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे व ते किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०७-२०२३) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

एरंडोल (जि. जळगाव) येथील ऐतिहासिक पांडववाडा हे राज्य संरक्षित स्मारक आहे. माहे जानेवारी, २०२० मध्ये पांडववाड्याच्या एका भिंतीच्या पायाकडील काही दगड मूळ भिंतीपासून वेगळे झालेले असल्यामुळे सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांना या पांडववाड्याच्या जतन दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत दि.२५ फेब्रुवारी, २०२० रोजी कळविण्यात आले होते. त्यानुसार सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नाशिक यांनी दि.०४ डिसेंबर, २०२० रोजी अंदाजपत्रक सादर केले परंतु सदर अंदाजपत्रक तज्ञ वास्तुविशारदांकडून तयार करण्याचे निर्देश दि.०९ डिसेंबर, २०२२ रोजी देण्यात आले आहेत.

(२) पांडववाडा या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता तज्ञ वास्तुविशारदांची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, त्यास अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या प्राप्त निविदांची छानननी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय स्तरावर सुरु आहे.

(३) तज्ञ वास्तुविशारदांची निवड झाल्यानंतर त्यांच्यामार्फत अंदाजपत्रक तयार करुन घेऊन त्यानुसार पांडववाडा या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील विस्तारित गावठाणातील सिटी सर्वेक्षण पुन्हा सुरू करण्याबाबत

**(१९) ५५५६० (२७-०१-२०२३). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील विस्तारित गावठाणातील घरांचे सिटी सर्वेक्षण करून प्रॉपर्टी कार्ड मिळणेबाबतचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित असून सदर सिटी सर्वेक्षणाचे काम शिदोरे अँड शिदोरे कंपनी मार्फत बेलापूर गावातून सुरुवात करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी बहुतांशी सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर काही कारणास्तव सदर सर्वेक्षण बंद करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर पुन्हा मे.टेक्कोम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंस अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स या एजन्सीमार्फत दिनांक ७ मार्च २०२२ पासून दिवाळे, सारसोळे व सानपाडा या गावठाण क्षेत्रातून सिटी सर्वेक्षण सुरू करण्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडून आदेश देऊनही आजपर्यंत सदरहू कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामस्थांमध्येही संभ्रम निर्माण झाला असल्याने, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिटी सर्वेक्षणास पुन्हा सुरु करण्याबाबत व त्यानुषंगाने ग्रामस्थांना त्यांच्या हक्काचे प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मौजे बेलापूर गावठाण व गावठाणालगत गरजेपोटी बांधलेल्या बांधकामाचे सर्वेक्षण करणेकामी मे. शिदोरे सिव्हील इंजिनिअर प्रा.लि. या कंपनीची दिनांक २८.०२.२०१९ च्या पत्रान्वये नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि, सदर संस्थेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०६.०१.२०२० च्या पत्रान्वये सदर सर्वेक्षणाचे काम स्थानिक विरोधामुळे पूर्ण होणे शक्य नसल्याचे कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

तथापि, स्थानिक जनतेच्या विरोधामुळे सर्वेक्षणाचे काम प्रलंबित आहे.

(४) व (५) जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडील दिनांक २८/०२/२०१९ व ०६/०३/२०२० च्या आदेशान्वये गावठाण व गावठाणालगत गरजेपोटी बांधलेल्या बांधकामाचे सर्वेक्षण करणेकामी खाजगी संस्थेची स्वतंत्रपणे नेमणूक करणेत आली आहे.तथापि, गावठाण व गावठाणलगत सर्वेक्षण व चौकशी स्थानिक जनतेच्या विरोधामुळे होवू शकले नाही.

---

## कागल (जि.कोल्हापूर) महसुल उपविभाग राधानगरी या विभागाचे मुख्यालय करवीर ऐवजी राधानगरी करण्याबाबत

**(२०) ५६४९९ (१३-०६-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि.कोल्हापूर) उपविभाग महसुल राधानगरी या विभागाचे मुख्यालय करवीर ऐवजी राधानगरी करण्याकरीता दिनांक १५ऑगस्ट, २०१३ रोजीच्या अधिसुचनेत सुधारणा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्याबाबत दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी शासनास पत्र निर्गमित करण्यात आले याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१) होय.

(२) याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून शासनाच्या दिनांक २३.०९.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे कार्यालयाने दिनांक ०५.०१.२०२३ व ११.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्वच अनुषंगिक पर्यायाचा विचार करता कागल व राधानगरी या दोन्ही तालुक्यातील नागरिकांना कोल्हापूर (करवीर) हेच ठिकाण मध्यवर्ती आहे असे अभिप्राय शासनास कळविले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता योजना अंमलात आणण्याबाबत

**(२१) ५६७६२ (२१-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास प्रवर्गातील अनेक विद्यार्थी शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळू शकल्याने व शहरात राहण्याची इतर सोय नसल्याने शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती आणि जमातीचे विद्यार्थी निवासाच्या सोयी अभावी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना आहे, परंतु इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अशी कोणतीही योजना नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता देण्यात यावा, अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच स्वाधार आणि स्वयमच्या धर्तीवर इतर मागासवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड) व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ व २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे उक्त बैठकीत इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ‘आधार’ नावाने स्वतंत्र निर्वाह भत्ता योजना सुरु करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२४-०७-२०२३) :** (१) राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत विविध स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत सुरु करण्याबाबत दि.२९.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.
तथापी, लोकप्रतिनिधी व विविध स्तरावरुन होत असलेल्या मागणीनुसार सदर वसतिगृहासाठी शासनाने स्वत: इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दि.२८.०२.२०२३ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(२), व (३) इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत आधार योजनेअंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी निश्चित केल्यानुसार त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करण्याची योजना प्रस्तावित आहे.
(४) व (५) हे खरे आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील सब जेल इमारत व कैदी खाना या इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याबाबत**

**(२२) ५७१७७ (३०-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील सब जेल इमारत व कैदी खाना सुमारे शंभर वर्षांपूर्वीचा असून त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे कैदी ठेवण्याची क्षमता ही ५० ते ६० असताना आजच्या घडीला जवळपास शंभरहून अधिक कैद्यांना ठेवले जात असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर सब जेला सन २०१९ ते ऑक्टोबर २०२२ पर्यंत एकूण ६६ लाख ४४ हजार २४ एवढी अनुदानाची रक्कम अद्याप प्राप्त झाली नसल्याने त्याचा परिणाम कैद्यांच्या दैनंदिन सुविधांवर होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पंढरपूर तहसील कार्यालयाने सदरहू बाबतीत लेखी अहवाल शासनाकडे सादर केला असून त्यात नवीन इमारतीची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन नवीन इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
लेखाशीर्ष (२०५६००५३) (१९) या लेखाशीर्षावर आहारभत्ता पुरवठयाकामी शासनस्तरावरुन अपर पोलिस महासंचालक कार्यालयाकडे प्राप्त होणारे अनुदान ज्या-त्या वेळेस संबंधित दुय्यम कारागृहास वितरीत करण्यात येते. पंढरपुर दुय्यम कारागृहास आहारभत्ता पुरवठयासाठीचे आजअखेर रु.५७,४६,६५७/- इतकी रक्कम अदा करावयाची प्रलंबित आहे.
(४) होय, हे खरे आहे.

अधिक्षक, दुय्यम कारागृह तथा तहसिलदार, पंढरपूर यांनी दुय्यम कारागृहामध्ये क्षमतेपेक्षा अधिकचे बंदी असल्याने कारागृहाची अधिकची क्षमता वाढविण्याकामी दुय्यम कारागृहाच्या निकषानुसार कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., पंढरपूर यांच्याकडील बांधकाम आराखडा व अंदाजपत्रकासह अहवाल जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांच्याकडे प्रशासकीय मंजूरीसाठीची बाब कार्यवाहीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागात मागील चार वर्षांपासून पदभरती न झाल्याने अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२३) ५७३५५ (२१-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात महसूल विभागातील १ हजार १५२ मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे सध्या रिक्त आहेत तसेच मागील चार वर्षांत पदभरती न झाल्यामुळे २९१ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील मंजूर २०७ पदांपैकी १०७ पदे अनेक दिवसांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त विभागातील रिक्त पदांमुळे जिल्ह्यात जमीन खरेदी-विक्रीस लागणाऱ्या संबंधित जागांचे नकाशे व इतर दस्ताऐजासाठी सामान्य नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत, तसेच उक्त जिल्ह्यातील महसूल विभागाचा कारभार सुरळीत चालण्याच्या दृष्टीने पदभरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी जिल्हा आस्थापनेवर माहे मार्च, २०२३ अखेर मंजूर १२३८ पदांपैकी ८१८ पदे भरलेली असून ४२० पदे रिक्त आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात भूमी अभिलेख विभागासाठी एकूण २०९ मंजूर पदांपैकी एप्रिल २०२३ अखेर, १०५ पदे पदे कार्यरत असून एकूण १०४ पदे रिक्त आहेत.

सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर कर्मचा-यांच्याकडे सोपवून कामकाज पार पाडण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

शासनाकडून पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे सन २०१४ नंतर भूमी अभिलेख विभागात पदभरती झालेली नव्हती. तथापि आता शासनाकडून पदभरतीवरील निर्बंध शिथिल केलेले असल्यामुळे विभागात गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक- टंकलेखक) संवर्गातील पदभरती सुरु असून दि. २८.०४.२०२३ रोजी कोकण विभागाकरीता एकूण २३० पदांकरीता निवडसूची प्रसिद्ध करण्यात आलेली असून त्यानुसार सदर उमेदवारांना लवकरच नियुक्ती देण्यात येणार आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील कामाची आवक व प्रशासकीय निकड विचारात घेऊन रत्नागिरी जिल्ह्यातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तलाठी भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ५७४०४ (२१-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६२८ तलाठ्यांची भरती प्रक्रिया माहे एप्रिल, २०२२ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संवर्गाच्या पद भरतीसाठी प्रयत्न करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी सदरील भरती तात्काळ करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भरती महसूल, वित्त विभाग तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास भरती प्रक्रियेला मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने तलाठी भरती तात्काळ राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१),(२),(३) व (४) तलाठी संवर्गातील दिनांक ३१.१२.२०२० अखेर पर्यत रिक्त असलेली एकुण १०१२ रिक्त पदे भरण्यास अपरमुख्य सचिव (सेवा) व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या अध्यक्षते खालील गठीत समितीने दिनांक २८.०१.२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. तसेच मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १६.०५.२०१७ च्या बैठकी अन्वये नव्याने निर्माण करण्यात आलेली एकुण ३११० तलाठी पदे व ५१८ मंडळ अधिकारी पदे याप्रमाणे एकूण ३६२८ पदे पुढील ४ वर्षात टप्प्या टप्प्याने भरण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर पदे निर्माण करण्याबाबतचा व त्याकरीता येणाऱ्या आवर्ती खर्चास सहमती दर्शविण्याच्या प्रस्तावास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गठीत उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २९.०४.२०२२ रोजी झालेल्या सन २०२२ मधील दुसऱ्या बैठकीचे दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या इतिवृत्तान्वये मान्यता दिली असून मा.मंत्रीमंडळाच्या निर्णया नुसार पद भरतीची कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत.

उक्त निर्देशानुसार पद भरती करावयाची झाल्यास इथून पुढे ४ वर्षे म्हणजेच सन २०२७ पर्यंत पदभरती प्रक्रिया राबवावी लागेल. परंतु तलाठी संवर्गातील रिक्त पदे व त्यांच्यावरील कामाचा ताण विचारात घेता, दिनांक ३१.१२.२०२० अखेर पर्यत रिक्त असलेली एकूण १०१२ रिक्त पदे व नव्याने निर्माण करण्यात आलेली एकूण ३११० तलाठी पदे अशी एकूण ४१२२ तलाठी पदे एकाच टप्यात १५ ऑगस्ट, २०२३ पूर्वी भरण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये मान्यता दिलेली आहे.

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षे बाहेरील), गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा प्रक्रिया टीसीएस-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि.) व आयबीपीएस (इन्स्टीटयुट ऑफ बॅकींग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनी मार्फत राबविणेबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.११.२०२२ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

उक्त निर्देशाच्या अनुषंगाने तलाठी संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून अतिरिक्त जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती दिनांक १५.१२.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली असून त्याबाबतची जाहिरात दिनांक २६.०६.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच पदभरतीसाठी प्रयत्न करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी सदरील भरती तात्काळ करण्याबाबत कोणतीही मागणी / निवेदन शासनास केल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे जिल्ह्यातील२०० विहिरींची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(२५) ५७९०८ (१९-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील ग्रामस्थांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबविण्याकरिता व मजुरांच्या हाताला काम मिळण्यासाठी औरंगाबाद विभागीय आयुक्तांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा विहीर योजना सन २०२० मध्ये अंमलात आणली, हे खरे आहे काय,

(२) तसेच परभणी जिल्हा प्रशासनाने या योजनेकडे दुर्लक्ष केले असून मागील दोन वर्षात २०० विहिरींचेही कामे पूर्ण झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या योजनेला गती देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) परभणी जिल्हयात भौतिकदृष्टया ११३ विहिरींची कामे पूर्ण झाली आहेत.
(३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरी अनुज्ञेय नसल्याने “राज्यात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरींना नव्याने मान्यता देण्यात येऊ नये आणि प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली आहे परंतु ज्या सार्वजनिक विहिरींची कामे अद्याप सुरु करण्यात आलेली नाहीत अशा विहिरींची कामे रद्द करण्यात यावी” अशी कार्यवाही करण्याच्या सुधारित सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

---

## विदर्भात नवीन नऊ जिल्हयांची मागणी शासनाकडे होत असल्याबाबत

**(२६) ५७९३७ (२१-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील ११ जिल्हयांचे विभाजन करुन आणखी ९ जिल्हे तयार करण्याची मागणी अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीबाबत सकारात्मक विचार करुन विदर्भात २० जिल्हे व २८ नवे तालुके निर्माण केल्यास विदर्भाच्या विकासाला चालना मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने माहिती घेतली आहे काय, त्यानुषंगाने जिल्हा विभाजन व नवे तालुके करण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१) राज्य शासनाकडे विविध माध्यमातून विदर्भातील ९ जिल्ह्यांच्या विभाजनातून १९ जिल्ह्यांच्या निर्मितीबाबत मागणी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा निर्मितीबाबत निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(२) नवीन जिल्हा/ तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा/तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(३) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने जिल्हा विभाजन/निर्मिती संदर्भात अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालावरील वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन शासनस्तरावर नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने सुधारित निकष ठरविण्यासाठी शासन परिपत्रक क्र. प्राफेब-२०११/प्र.क्र.९६/म-१०, दिनांक ०२.०३.२०२३ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) येथे चिमूर क्रांती जिल्हा निर्मितीच्या मागणीबाबत**

**(२७) ५८४२३ (२१-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील चिमूर या तालुक्याला चिमूर क्रांती जिल्हा निर्मिती करावी या मागणीसाठी 'चिमूर क्रांती जिल्हा कृती समितीच्या वतीने शासनास दिनांक ०५ जानेवारी, २००२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव पाठवुनही त्यास मंजुरी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिमूर जिल्हयाच्या निर्मितीचा मागणीचा प्रस्ताव चिमूर क्रांती जिल्हा कृती समितीने शासनास वारंवार मागणीद्वारे सादर करण्यात येत असून २० वर्षापेक्षा अधिकचा कालावधी लोटनुही त्यास मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिमूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर असुन संबंधीत अधिकाऱ्यांची नियुक्ती दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास होऊनही प्रशासकीय कामकाज सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात जिल्हा निर्मितीत समिती स्थापन करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार चिमूर जिल्हानिर्मिती व चिमूर येथील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्तीसह प्रशासकीय कामकाज सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) महसूल व वन विभागाच्या दिनांक ०२.०८.२०२२ च्या शासन आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, चिमूर या पदावर पदस्थापना करण्यात आली होती. तथापि, आज रोजीपर्यंत सदर पद रिक्त आहे. तसेच शासन आदेश, महसूल व वन विभाग, दिनांक २७.०७.२०२२ अन्वये श्री. डी. एम. पोरच्चेट्टीवार यांची नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी कार्यालय, चिमूर येथे नियुक्ती करण्यात आली असून ते दिनांक १.८.२०२२ ला सदर पदावर रुजू झाले आहेत. त्यांचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी, चिमुर या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपविभागीय अधिकारी, चिमूर यांचेकडे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे दिनांक ३०.९.२०२२ च्या आदेशान्वये सोपविण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अपर जिल्हाधिकारी, चिमूर यांना त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित न झाल्यामुळे अपर जिल्हाधिकारी चिमूर कार्यालयाअंतर्गत प्राप्त होणारे अपील विषयक व इतर कामकाज जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथून सुरू आहे. दिनांक ११.०९.२०१९ च्या शासन निर्णयानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वयीत करण्यास तसेच सदर कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी (ग्रेड वेतन रु.७६००/- च्या वरील वेतनश्रेणीतील पद असल्याने) या पदास मान्यता घेण्यासाठी दिनांक १३.०६.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर मंत्रीमंडळ प्रस्तावास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अपर जिल्हाधिकारी, चिमुर यांना त्यांना नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याकरीता विधी व न्याय विभागाच्या सहमतीने अधिसूचना निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्हयांचे विभाजन/ पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा पुनर्रचना समिती नियुक्त करण्यात आली असून त्यानुसार शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयात जमीन खरेदी विक्रीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२८) ५८६२८ (२१-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात जमीन खरेदी विक्रीची ३ हजार ७० प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत विकसित ई फेरफार डॅशबोर्डनुसार माहे जानेवारी, २०२३ अखेर सोलापूर जिल्ह्यातील मंडल अधिकारी स्तरावर नोंदी प्रमाणीकरणाकरीता एकूण ३३२० इतक्या फेरफार नोंदी प्रलंबित आहेत. त्यापैकी २६८२ इतक्या फेरफार नोंदी १५ दिवसांतील व उर्वरित ५४८ इतक्या नोंदी १५ दिवसांवरील आहेत.

(२) व (३) बाबत

ई फेरफार प्रणालीअंतर्गत संबंधित सर्व महसूल नायब तहसिलदार, मंडल अधिकारी यांचा प्रलंबित फेरफार तात्काळ निर्गतीबाबतचा साप्ताहिक आढावा दर शुक्रवारी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यात महाराष्ट्र-गुजरात सीमेवर असलेल्या झाई गावातील घरे गुजरात राज्याच्या हद्दीत दाखविल्याबाबत

**(२९) ५८६५३ (२१-०४-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यात महाराष्ट्र-गुजरात सीमेवर असलेल्या झाई गावातील मच्छीपाडा येथील अनेक घरे गुजरात राज्याच्या हद्दीत दाखवल्यामुळे स्थानिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीची आणि असंतोषाची भावना पसरली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान भेट देऊन जागेची मोजणी करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे काय, अहवालाचे प्रमुख निष्कर्ष काय आहेत, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये दि.१४.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र सीमेवर गुजरातची घुसखोरी या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. त्याअनुषंगाने खात्री करण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि.१५.१२.२०२२ रोजी मौजे झाई ता. तलासरी, जि. पालघर येथे समक्ष भेट देऊन पाहणी केलेली आहे. सदर पाहणी दरम्यान मौजे झाई, ता. तलासरी, जि. पालघर येथील सीमेवरील रहीवासी व ग्रामपंचायत गोवाडा, ता. उंबरगांव, जि. वलसाड, राज्य गुजरात येथील सीमेवरील रहीवासी यांचे एकमेकांसोबत सलोख्याचे संबंध असुन याबाबत कुठल्याही

प्रकारची तक्रार / त्रास नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विशेषतः कोकणातील एलईडी ट्रॉलरवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी कक्षाची स्थापना करण्याबाबत

**(३०) ५९३८४ (१९-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः कोकणातील एलईडी ट्रॉलरवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी कक्षाची स्थापना करण्यास अद्याप राज्य शासनाने मान्यता दिली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेकायदा ममच्छीमारीवर नियंत्रण आणण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मत्स्य विभागातील अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाज सांभाळून गस्तीवर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गस्तीवर अनेक वेळा पोलीस कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे त्याचा गैरफायदा पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांकडून घेतला जातो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार बेकायदा पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :**(१) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व राज्याच्या सागरी मत्स्यव्यवसायाचा शाश्वत व समतोल विकास साधण्यासाठी राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रावर नियंत्रण, नियमन व देखरेख करण्यासाठी अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्याचे नियोजन आहे.
(२) शासन अधिसूचना दिनांक १७/०३/२०२१ अन्वये सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या ७४ अधिकाऱ्यांना अंमलबजावणी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावी गस्त घालण्याच्या दृष्टीने कार्यालयीन कामावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन अंमलबजावणी अधिकारी पदाची कर्तव्य पार पाडण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात येत असते.
(३) राज्याच्या जलधी क्षेत्रात नियमित गस्ती नियोजनानुसार समुद्रात गस्त घालत असताना पोलीस कर्मचारी सोबत असतात. परंतु स्थानिक मच्छिमार संघटना/ प्रतिनिधी यांच्याकडून अचानकपणे प्राप्त झालेल्या संदेशानुसार, तातडीने गस्तीचे नियोजन करीत असल्याच्या प्रसंगी गस्तीवर जाताना पोलीस उपलब्ध होत नाहीत.
(४) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये दिनांक २५/०१/२०२२ अन्वये सुधारणा करण्यात आलेली असून सुधारित तरतूदीनुसार शास्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त मासेमारी नौका, नौकेवरील साहित्य, जाळे व मासळी जप्त करण्याची तरतूद आहे. त्यानुसार अनधिकृत मासेमारी केल्याचे निदर्शनास आल्यास्तव सिंधुदूर्ग जिल्हयामार्फत एकूण २५ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आलेली असून रू.४७.४४ लक्ष इतका महसूल शासन जमा करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील बेदखल कुळांचे विविध प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ५९७७८ (२१-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कुळांना संरक्षण देण्यासाठी तसेच 'कसेल त्याची जमीन' हे तत्व घेऊन सुधारीत कुळ कायदा १९५७ साली तयार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बेदखल कुळांचे विविध प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील ६५ टक्के पेक्षा जास्त संख्येने असलेल्या कुणबी म्हणजेच शेतकरी समाजाचा हा प्रश्न असून जमिनी नावावर नसल्यामुळे घर बांधणी, कृषी विषयक योजनांचा लाभ इत्यादीपासून त्यांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१७ याकालावधीमध्ये मा.मुख्यमंत्र्यांनी रत्नागिरी येथे कोकणातील कुणबी समाजाचा अभ्यास करुन त्यांच्या विकासासाठी पेजे समितीच्या अहवालातील शिफारशी स्वीकारुन बेदखल कुळांचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन देऊन ५ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) कोकणातील बेदखल कुळाच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनास अहवाल सादर केलेला असुन, या अहवालातील कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत आणि बेदखल कुळांच्या धोरणाबाबत अधिकार अभिलेखात (७/१२ सदरी) योग्य त्या नोंदी घेण्याच्या शिफारशीच्या अनुषंगाने कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांबाबत अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ मध्ये नियम ११ अ अशी सुधारित तरतूद करण्यात आली आहे. तसेच या नियमांमुळे नोंदविलेले अभिलेखातील नोंदी संदर्भातील शेतमजूर आणि कारागिराच्या वस्त्यांची ठिकाणे व घरे आणि घराखालील जमिनीच्याबाबत दिनांक ३१ मे २०२२ ही तारीख कट ऑफ डेट म्हणून शासन अधिसूचना दिनांक ०१ एप्रिल २०२२ अन्वये निर्धारीत केली आहे. या तरतुदीमुळे कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांचे अधिकार अभिलेख अद्ययावत होण्यास मदत होईल.

बेदखल कुळाबाबतच्या शासन निर्णयानुसार ज्या खातेदारांची बेदखल कुळ म्हणून अभिलेखात नोंद झालेली आहे. त्यापैकी ज्या खातेदारांनी कुळवहिवाट सिध्द करण्यासाठी मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० व कलम ४ (२) (सुधारणा) नुसार दावे दाखल केलेले आहेत, अशा दाव्यांमध्ये सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

### पोटखराबा वर्ग अ जमिनीचे क्षेत्र लागवडी योग्य् करण्याकरिता सुरु असलेल्या मोहिमेस गती देण्याबाबत

**(३२) ६०१५४ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन परिपत्रकानुसार शेतकऱ्यांच्या ७/१२ वर पोटखराबा वर्ग अ म्हणून असलेली जमीन जमीन धारकाने लागवडी योग्य केल्यास त्या जमिनीची स्थळ पाहणी करुन जमिनीचे लागवडी योग्य जमिनीमध्ये समावेश केला जातो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीचा शेतकऱ्यांच्या ७/१२ वर लागवडी योग्य समावेश झाल्याने कर्ज मर्यादा वाढणे तसेच शेतजमिनीचे मुल्यांकन वाढले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात या मोहिमेस गती देण्याबाबत व प्राप्‍ प्रस्तांवावर जलद गतीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर जमिनीच्या महसुल अधिकार अभिलेख (७/१२) वर वरील पोटखराब वर्ग (अ) लागवडीयोग्य असलेले खराबा क्षेत्र कमी करून लागवडी योग्य क्षेत्रात समाविष्ट केल्यास सदर शेत जमिनीचे मुल्यांकनामध्ये सकारात्मक वाढ होऊ शकते.

(३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील १९/८/२०१९ रोजीच्या परिपत्रका अन्वये संबंधित महसुली गावातील जमिन धारकाने वर्ग अ खाली येणारी जमिन कोणत्याही लागवडी खाली आणल्यास त्या करीता गाव निहाय अतिरीक्त आकारणी करणेबाबत सविस्तर सुचना निर्गमित केल्या आहेत व अतिरीक्त आकारणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. उपरोक्त बाबत क्षेत्रिय महसूल अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश दिलेले आहेत. तसेच, वर्तमानपत्रामध्येही सदरबाबत प्रसिद्धी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि.पुणे) तालुक्यातील नाट्यगृहाला जागा मिळण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(३३) ६०२५२ (२४-०४-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील नाट्यगृहाला जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास दाखल करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.उप मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यापुर्वी देखील वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) व (२) होय,

विषयाधीन प्रकरणी कृषी विभागामार्फत प्राप्त झालेल्या अहवालाची छाननी करून गायरान जमिनीशी संबंधित तरतूदी, वित्तीय तरतूदी व इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन यथोचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सेनगाव (जि.हिंगोली) येथील पंचायत समिती कार्यालयांतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता न मिळाल्याबाबत

**(३४) ६०८२१ (२१-०४-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) येथील पंचायत समिती कार्यालयांतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या जवळपास २५० कामांना मागील सहा महिन्यांपासून प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे रोजगार हमीची कामे सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समिती कार्यालयातील सर्व रोजगार हमी योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पंचायत समिती, सेनगाव येथे एकूण २२७० कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एकुण ८६५ कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १४०५ कामे शेल्फवर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

## तेलंगणा- महाराष्ट्र सीमेवरील चंद्रपूर जिल्हयातील राजुरा उपविभागातील जिवती तालुक्यात येत असलेली सीमालगतची गावे स्थापित नसल्याबाबत

**(३५) ६०८७७ (२१-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगणा- महाराष्ट्र सीमेवरील राजुरा (जि.चंद्रपूर) उपविभागातील जिवती तालुक्यात येत असलेल्या सीमालगतच्या १४ गावांचा विकास घडून आला नसून किमान ३५ वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडानंतर सीमेवरील गांवे अजुनही स्थापित झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही राज्याच्या वादात सीमेवरील गांवातील नागरिकांना विविध नागरी सोयी-सुविधा मिळण्याकरिता अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) १४ वादग्रस्त गावाबाबत तेलंगणा शासनाने रीट याचिका क्रमांक ६९९५/१९९६ अन्वये हैद्राबाद येथील मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली सदर दाव्यामध्ये मा. न्यायालयाने वादग्रस्त गावाचे कारभारात महाराष्ट्र शासनाने ढवळाढवळ करू नये असे निर्देश दिलेले होते. सदर आदेशाविरुद्ध महाराष्ट्र शासनाने स्पेशल रिट याचिका क्र. १०३३८/१९९६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. सदर रिट याचिकामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सदरचे प्रकरण ३ महिन्याच्या आत निकाली काढण्याचे मा. उच्च न्यायालय हैद्राबाद यांना निर्देश दिल्यानंतर आंध्र प्रदेश सरकारने मा. उच्च न्यायालय हैद्राबाद येथे दाखल केलेली रिट याचिका मागे घेतलेली आहे. याचाच अर्थ सदर वादग्रस्त १४ गावे महाराष्ट्र राज्यात अंतर्भूत आहेत. सद्यस्थितीत सदर १४ गावांमध्ये महाराष्ट्र शासनाचे वतीने प्राथमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, रस्ते, वीजपुरवठा व पाणी इत्यादी सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहेत. शासनपत्र दि.१३/०६/२०२२ अन्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार सदर १४ गावांची मोजणी कामाची सुरूवात उप अधिक्षक भूमि अभिलेख, जिवती कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ५५ झाडे कापण्यात आल्याबाबत

**(३६) ६०९२७ (०९-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ५५ झाडे कापण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त प्रकरणी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम,१९६४ कलम १(२) अन्वये सदर क्षेत्र नागरी क्षेत्रात येत असल्यामुळे महाराष्ट्र (नागरी) वृक्ष जतन व संरक्षण कायदा, १९७५ चे कलम (५) नुसार उपायुक्त, चंद्रपूर शहर

महानगरपालिका, चंद्रपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम ८(३) नुसार चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्र.२७६४, दिनांक ०८/१२/२०२२ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी ५५ झाडे तोड करण्याची परवानगी दिलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोर्शी (ता.वरुड, जि.अमरावती) येथे अतिवृष्टीमुळे विहिरी खचून सिंचनावर झालेला दुष्परिणाम

**(३७) ६०९८६ (२१-०४-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी (ता.वरुड, जि.अमरावती) येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या विहिरी खचून सिंचनावर विपरित परिणाम होऊनही प्रशासनाकडून अद्यापपर्यंत खचलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वेक्षणाअभावी खचलेल्या विहिरींची दुरुस्ती व डागडूजी अशा उपाययोजना न झाल्याने सिंचन क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शेती उत्पादनातही घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत विहिरींचे सर्वेक्षण व रोजगार हमी योजना वा अन्य यंत्रणेमार्फत करुन त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१९-०७-२०२३) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने दिनांक १२.६.२०२१ च्या पत्रान्वये "Repair & maintainance of individual asset(s), in any case, is not permissible under Mahatma Gandhi NREGA" अशा सूचना दिलेल्या आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे घेण्यास केंद्र शासनाकडे दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये विनंती करण्यात आलेली असून दिनांक २६.७.२०२२ व २३.११.२०२२ रोजीच्या शासन पत्रांन्वये स्मरण देण्यात आलेले आहे. तसेच सद्यस्थितीत यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि त्यास अद्याप केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेली नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

## रायगड जिल्ह्यात मानवनिर्मित वणव्यांमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याबाबत

**(३८) ६११७० (२१-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात डोंगराळ भागातील जंगलामध्ये लावण्यात येणाऱ्या मानवनिर्मित वणव्यांमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे व नियोजन न केल्याच्या काराभारामुळे तसेच वेळीच उपाययोजना व कार्यवाही होत नसल्यामुळे वणव्यांचे प्रमाण कमी न होता वाढतच आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवडीला फार महत्त्व असूनही मानव निर्मित वणव्यांमुळे वनसंपत्ती नष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास कारणीभूत असणारे मानव निर्मित वणव्यांचे प्रमाण कमी करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०७-२०२३) :** (१) रायगड जिल्हयात ठाणे वनवृत्तातील अलिबाग व रोहा हे दोन वनविभाग कार्यरत असून,त्याठिकाणचा डोंगराळ भाग हा दगड व खडकाळ व काही ठिकाणी अति उताराचा असल्याने लहान गवत अतिउष्णतेमुळे तापून आगी लागण्याची शक्यता आहे. तसेच वनालगत असलेल्या शेतकऱ्यांची राब जाळण्याची पध्दत असल्याने शेतकऱ्याकडून वनामध्ये आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. वणव्यामुळे जंगलातील पालापाचोळा जळत (Ground fire) असल्याने मोठी झाडे जळली जात नाहीत. त्यामुळे मानवनिर्मित वणव्यामुळे पर्यावरणाच्या मोठया प्रमाणात ऱ्हास होत नाही. माहे जानेवारी २०२३ मध्ये अलिबाग येथे २९ तर रोहा या ठिकाणी १५ आगीच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) वन विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केलेले नसून वणवे लागू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपायोजना करण्यात आलेल्या आहेत. वणवा लागू नये म्हणून क्षेत्रीय स्तरावर वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये ग्रामसभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती केली जाते.तसेच वनांमध्ये विविध आकाराच्या जाळरेषा घेण्यात येतात. एखादया ठिकाणी आकस्मितरीत्या आग लागल्यास, स्मार्ट फोन मार्फत संपर्क करुन आगीच्या ठिकाणी जाऊन संयुक्त वन व्यवस्थापन सदस्य व ग्रामस्थ यांच्या मदतीने व शासनाकडून पुरविण्यांत आलेल्या फायर ब्लोअर इत्यादी साहित्याचा वापर करुन वणवा विझविण्यात येतो. वनवणव्याबाबत भारतीय अधिनियम १९२७ अन्वये गुन्हा नोंद करुन कायदेशीर कारवाई केली जाते. त्यामुळे आगीचे प्रमाण कमी होत आहे.

(४) वणवे लागू नये म्हणून प्रतिबंधात्मक योजना वेळीच केल्या असून वनकर्मचारी व वनअधिकारी याबाबत दक्ष आहेत. वणव्याकडे कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केले जात नाही. त्यामुळे वन अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महसूल विभागाकडून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या आधार लिंक योजनेबाबत**

**(३९) ६१५५८ (२१-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागाकडून प्रायोगिक तत्वावर सातबारा उताऱ्याशी शेतकऱ्यांचा आधार क्रमांक लिंक करण्याची योजना राबविण्यासाठी पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील एका गावाची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचा आधार क्रमांक सातबारा उताऱ्याशी लिंक करण्याचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल तसेच दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमाराअखेर या योजनेच्या कामकाजाची सध्यस्थिती काय आहे,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम (DILRMP) अंतर्गत ७/१२ वरील खातेदारांचे नावास आधार क्रमांक जोडणी सूचना उदिष्ट म्हणून प्राप्त आहेत. त्यानुसार ही कार्यवाही करावयाचा शासनाचा मानस आहे. ७/१२ वरील खातेदार नावाशी त्या खातेदाराचा आधार क्रमांक जोडण्याची प्रक्रिया ऐच्छिक असेल. या संदर्भात तांत्रिक प्रणाली निर्मितीचे कामकाज सुरू आहे.

---

**मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथील मच्छिमारांना खावटी अनुदानाचा लाभ देण्याबाबत**

**(४०) ६१६०१ (१९-०४-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथे झालेल्या अतिवृष्टी व वाऱ्यामुळे समुद्रात भरती आल्याने मासेमारी करण्यासाठी गेलेल्या नौका मासे न मिळाल्याने परतल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,मासेमारी ही हवामानावर अवलंबून असल्यामुळे मच्छिमारांनाही शेतकऱ्यांप्रमाणेच ओला दुष्काळ जाहीर करून आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या खावटी अनुदानाप्रमाणे मच्छिमारांना विभागाकडून लाभ देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहेकाय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोकणातील मच्छिमारांना खावटी अनुदान योजनेचा लाभ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सन २०२२-२३ मध्ये ऑगस्ट, २०२२ व सप्टेंबर, २०२२ या कालावधीत कोकण विभागातील सागरी जिल्हयामध्ये झालेली अतिवृष्टी/ मुसळधार पाऊस, खराब वातावरणामुळे तसेच हवामान खात्याकडून प्राप्त सतर्कतेच्या इशाऱ्यामुळे मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नसून काही मासेमारी नौकांना मासेमारी न करताच परत यावे लागले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) याबाबतचे निवेदन आढळून आलेले नाही.
तसेच अतिवृष्टी, मुसळधार पाऊस, खराब वातावरण या सर्व उद्भवणाऱ्या आपत्ती या नैसर्गिक असून समुद्रातील मासेमारी ही पूर्णत: हवामानावर अवलंबून आहे. सद्य:स्थितीत खावटी अनुदानाप्रमाणे लाभ देण्याचा कोणताही प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बोधेवाडी (ता.कोरेगांव, जि. सातारा) भाडळे या गट नकाशामध्ये सर्व्हे नंबर नकाशाप्रमाणे रस्ते दर्शविले नसल्याबाबत**

**(४१) ६१७१८ (२१-०४-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बोधेवाडी (ता.कोरेगांव, जि. सातारा) भाडळे या गावाच्या गट नकाशामध्ये सर्व्हे नंबर नकाशाप्रमाणे रस्ते दर्शविले नसल्यामुळे स्थानिक लोक रस्त्यावर अतिक्रमण करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,
मौजे बोधेवाडी या वाडी विभाजनानंतरच्या गावच्या गट नकाशात सर्व्हे नंबर च्या नकाशाप्रमाणे रस्ते दर्शविलेले नव्हते. तथापि, सदरच्या नकाशात सर्व्हे नंबरच्या नकाशाप्रमाणे सर्व रस्ते अद्ययावत करणेत आलेले आहेत. तसेच, सर्व्हे नंबरच्या नकाशाप्रमाणे बोधेवाडीच्या गावनकाशात रस्ते दर्शविले नसल्यामुळे स्थानिक लोक रस्त्यावर अतिक्रमण करत असल्याचा कोणताही संदर्भ प्राप्त नाही.
(२) होय,
मौजे भाडळे गावचा सर्व्हे नंबरच्या नकाशाप्रमाणे गट नकाशात रस्ते नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुळ सर्व्हे नंबर नकाशाप्रमाणे भाडळे गावचा गट नकाशा व वाडी विभाजना नंतरचा बोधेवाडी गावच्या नकाशात रस्ते अद्ययावत करणेत आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यातील संख येथे अप्पर तहसीलदार कार्यालयात सोयी-सुविधा नसल्याबाबत**

**(४२) ६१९०६ (२१-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील संख येथे अप्पर तहसीलदार कार्यालय होऊन चार वर्षे झाली तरी याठिकाणी अद्याप सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयात अद्याप दुय्यम निबंधक कार्यालय नाही, मुद्रांक विक्रेत्यांचीदेखील नियुक्ती केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर कार्यालयात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

संख हे गांव जत तालुक्यामध्ये असल्याने दुय्यम निबंधक कार्यालय जत येथे पूर्वीपासून कार्यरत आहे. तथापि, जिल्हा निबंधक सांगली यांनी त्यांचे पत्र दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये ०२ मुद्रांक विक्रेत्यास संख येथे मुद्रांक विक्री करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यालयात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर कार्यवाहीत आहे. क्षेत्रिय कार्यालयाकडून परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त होताच कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात “क” वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्र रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४३) ६२५३२ (२०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात “क” वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्र रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्रात ‘क’ वर्ग नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्र राज्य रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत तपशिलवार सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही फक्त राज्यातील ग्रामीण भागाकरिता मर्यादित असून राज्यातील नागरी भागात या योजनेतंर्गत कामे केली जाऊ शकत नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयातून शेतकऱ्यांना नोटीस न पाठविताना शेतीची मोजणी केली जात असल्याबाबत

**(४४) ६२६७५ (२१-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयातून शेतक-यांना नोटीस न पाठविता शेतीची मोजणी केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयातून शेती मोजणीची शेतक-यांना नोटीस पाठविणे बंधनकारक आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधित कार्यालयातील दोषीअधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

अर्जदार यांचेकडून मोजणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जदाराने मोजणी फी चा भरणा केल्यानंतर सदर मोजणी अर्ज ई-मोजणी आज्ञावलीमध्ये नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येते. तद्नंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २३० अन्वये मोजणी अर्जात नमूद केल्याप्रमाणे संबंधित अर्जदार व सहधारक व लगतधारक यांना मोजणीची नोटीस पोस्टाने / समक्ष बजाविण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) दिनांक २७/११/२०२२ रोजी दै. लोकमत या वृत्तपत्रामध्ये उद्या शेत मोजणी मात्र नोटीस अद्याप दिली नाही या आशयाची बातमी प्रसिद्ध झाली होती. या अनुषंगाने पडताळणी केली असता, सदर प्रकरणी मुदतीत नोटीस बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. उप अधिक्षक, भूमि अभिलेख, तिवसा याचे कार्यालयाकडून दिनांक २०.११.२०२२ रोजीची मोजणी नोटीस अर्जदार, सहधारक व लगतधारक यांना समक्ष देण्यात आली असून कार्यालयीन प्रतीवर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या आहेत. दिनांक २८.११.२०२२ रोजी मोजणी करण्यात आली असून संबधितांना क प्रत मुदतीत पुरविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील पांदण रस्ते योजनेंतर्गत कामे मंजूर करण्याबाबत

**(४५) ६२९०० (२०-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा येथे मातोश्री पाणंद रस्ते तसेच अमरावती जिल्ह्यातील पांदण रस्ते योजनेंतर्गत मंजूर असलेल्या कामांना मौजे दाढी तालुका भातकुली येथील ई क्लास मधून वा तलावाच्या खोलीकरणाच्या कामांमधील मुरुम पांदण रस्त्याच्या कामात अडथळा उचल व वाहतूक करण्याची परवानगी तसेच भातकुली (ता.वायगाव, जि.अमरावती) व इतर तालुक्यातील रस्त्यावरील योजनेंतर्गत मंजूर करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र देऊन कामे मंजूर करण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांचे पत्र क्रमांक ५२ दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास संबंधित तहसीलदार यांना कळवून परवानगी व कामे कार्यान्वित करण्याबाबत आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कानफोडी ते सायत (भाग-१, भाग-२ आणि भाग-३) मंजुर कामांकरीता मौजे बोरगाव, ता. भातकुली येथील गट नं.१८ मधुन निशुल्क स्वरुपात गौण खनिज उचल व वाहतुक करण्यास परवाना देण्यात आला आहे. तसेच मौजे दाढी येथील गट नं.१७२ मधुन गौण खनिजाकरीता परवाना निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना जमिन मोजणी नकाशेदेखील सातबारा उताऱ्यावर उपलब्ध करुन देण्याच्या निर्णयाबाबत**

**(४६) ६३०३२ (२१-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना आता जमिन मोजणी नकाशे देखील सातबारा उताऱ्यावर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नकाशे उपलब्धतेची सेवा केव्हापर्यंत सुरु करण्यात येणार आहे,याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
असा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) भूमी अभिलेख विभागाने bhumiabhilekh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर गांव व सर्व्हे क्रमांकाचे नकाशे उपलब्ध करून दिलेले आहेत. या नकाशांना ७/१२ आणि Unique Land Parcel Identification Number (ULPIN) जोडणी करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) येथील राखीव भूखंडावर अनधिकृतपणे अकृषक करुन केलेल्या प्लॉटबाबत**

**(४७) ६३४२० (२१-०४-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) येथील उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या सर्वे नंबर १४८ हा ग्रंथालयांकरिता राखीव असणाऱ्या भूखंडावर २२ भूखंड पाडून अनधिकृत पणे केलेले अकृषक अर्थात एन ए ले आउट सह २२ प्लॉट रद्द करण्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील शेत जमिनीवर शासनाचे वाचनालयाचे आरक्षण होते मात्र या आरक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या नगरपरिषदेतील तत्कालीन कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून वाचनालयासाठी आरक्षित असलेल्या शेत जमिनीवर वाचनालय बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०७-२०२३) :** (१) व (२) होय. सर्वे नंबर १४८ ता. सेलू, जि. परभणी मध्ये ग्रंथालयासाठी राखीव असलेल्या जागेवर संबंधीत जागेच्या मालकाने २२ प्लॉट चे लेआउट करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता. प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात आलेली नाही. मालमत्ता कर आकारणी नोंदवही मध्ये कोणत्याही आदेशाशिवाय झालेली नोंद रद्द करण्यात आलेली आहे. तसेच नामांतर विभागातील संबंधीत कर्मचाऱ्यास निलंबीत करण्यात आले आहे.

(३) सदर आरक्षण प्रकरणी संबंधित जागेचे मालक श्री नंदकुमार तु. हेलवाडे यांनी रिट याचिका क्रमांक ५६९२/२०२२ नुसार सदरील आरक्षण वगळणे बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती. सदर याचिकेच्या निकालामध्ये मा. उच्च न्यायालयाने सदरील आरक्षण व्यपगत झाल्याचे जाहिर करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ प्रमाणे अधिसूचना निर्गमीत करण्याचे निर्देश दिले होते. सबब सदर जागेवर वाचनालयाचे बांधकाम करण्यासाठी कोणतीही कार्यवाही उपाययोजना करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कात उत्पादकांच्या वनखात्यासंबंधातील अटी व नियम शिथिल करण्याबाबत**

**(४८) ६३६४५ (२१-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कात व्यवसायासंदर्भात सन २०१७ मध्ये राज्य स्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून तळ कोकणातील कात उत्पादक हे खैर या झाडापासून पारंपारीक पद्धतीने उत्पादन करत असून वर्षातून केवळ चार महिने प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रिया करुन त्यास लागणारे खैर जातीचे लाकूड हे स्थानिक मालकी क्षेत्रातून उपलब्ध करुन त्या व्यवसायातून परिसरातील कामगार व शेतकरी यांना रोजगार मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या व्यवसायावर विविध निर्बंध, परमिट पद्धत व तिचे नुतनीकरण करणे अशा प्रकारचे नवीन नियम लावण्यात आले असून या नियंत्रण वन खात्यामार्फत होत असून खैर वाहतुक पास देण्याचे अधिकार सहाय्यक वनसंरक्षक यांना देऊन जिल्ह्याला हे पद एकच असल्याने वाहतुक पास मिळण्यास विलंब लागल्यामुळे कात व्यवसायिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सिंधुदूर्ग जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीने खैर विक्री व्यवसायाला वन विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली असून वाहतुकीला परवाना दिला, मात्र रत्नागिरी जिल्ह्यात अशी मान्यता दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सिंधुदूर्ग जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धर्तीवर रत्नागिरी जिल्ह्यातील कात व्यवसायिकांना वाहतुकीस मान्यता देणे, त्याचबरोबर कात मालावर वस्तू आणि सेवा कर आकारला जाते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त कर आकारल्याने वाहतुकीस पासाची अट शिथिल करुन राज्यस्तरीय समितीकडील कात उद्योगाबाबतचे नियंत्रण काढून टाकणे व कात उद्योग हा वूडबेस इंडस्ट्री या प्रकारातून काढून कृषी पुरक ग्रामोद्योग याच प्रचलित व जुन्या प्रकारात समाविष्ट करावा आणि उत्पादन युनिटची मालकी बदलणेसंदर्भातील मान्यतेबाबतचे अधिकार विभागीय स्तरावर देण्यात यावेत यासंदर्भात कात व्यवसायिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, कात व्यवसायाबाबत असलेल्या जाचक अटी व नियम शिथिल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे,
केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना दिनांक ११.११.२०१६ रोजीच्या राजपत्रान्वये खैर प्रजातीच्या लाकडापासुन कात निर्मिती ही बाब लाकडावर आधारीत उद्योगाच्या परिभाषेत मोडत असलेने त्याकरीता गठीत राज्यस्तरीय समिती कडून सदर व्यवसाय करणेसाठी पुर्व परवानगी घ्यावी असे निर्देश आहेत. त्यानुषंगाने राज्यस्तरीय समितीने चिपळूण व सावंतवाडी वनविभागातील एकूण १०२ कात उद्योगांना मंजुरी दिलेली आहे.
कात निर्मिती हा व्यवसाय पारंपारिक व यांत्रीक पध्दतीने केला जातो. वर्षातील साधारणत: ऑक्टोबर ते एप्रिल या मोसमात हा व्यवसाय केला जातो. या व्यवसायात कात भट्टी असे संबोधले जाते. कात तयार करणेसाठी चुल्हाण व बॉयलर असे दोन पध्दतींचा वापर करण्यात येतो. या दोन्ही जिल्हयामध्ये मालकी क्षेत्रात खैर वृक्ष मोठया प्रमाणात आढळून येतो. त्यामुळे महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार मालकी क्षेत्रातील खैर वृक्षांच्या तोडीस वृक्ष अधिकारी परवानगी देऊन, महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ नुसार वाहतूक पासाने कच्चा माल प्राप्त करुन कातभट्टी अंतर्गत प्रक्रियावरुन कात निर्मिती केली जाते.

(२) हे खरे नाही.

राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिलेल्या कात उद्योग चालू करणेसाठी कात उद्योग धारक यांना परमिटची आवश्यकता आहे. यासाठी राज्यस्तरीय समितीने महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील नियम क्र.५५ अन्वये परमिट देण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांना प्रदान केलेले आहे.

त्याच अधिकाराचा वापर करुन मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांनी महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील नियम क्र.५८ नुसार मर्यादित कालावधीसाठी कात उद्योगांना कात निर्मितीकामी परमिट दिलेले आहे. आणि नियम क्र.६० नुसार परवान्यात नमूद केलेला कालावधी संपल्यानंतर परमिट परत करणेबाबत सूचित केलेले आहे.

महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील नियम ३२ (१) (अ) अन्वये खैर प्रजातीचे लाकूड वाहतूक परवाना जारी करणेचे अधिकार सहायक वनसंरक्षक यांना प्रदान करणेत आलेले आहे.

सद्य:स्थिती मध्ये सावंतवाडी वन विभागात सहायक वनसंरक्षक यांची दोन पदे आणि चिपळूण वनविभागात एकच पद कार्यरत आहे. त्यामुळे वाहतूकपास देण्यास विलंब झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

वनविभागाचे अखत्यारीत असणाऱ्या कात उद्योगधारक यांनी यापूर्वी सिंधुदुर्ग जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेकडून वाहतूक पास परवाना/मान्यता घेतलेली आढळून येत नाही. तसेच सिंध्दुदूर्ग जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी खैर लाकुड वाहतुकीस परवाना दिलेला नाही.

(४) रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती मार्फत खैर लाकुड वाहतुकीस वाहतुक पास देण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने विभागीय वन अधिकारी, चिपळून यांचे पत्र दिनांक १९.०६.२०२३ अन्वये रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती यांना खैर लाकुड वाहतूकीस वाहतुक परवाना देण्याचे अधिकार महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ नियम ३२ (अ) नुसार सहायक वनसंरक्षक यांना आहेत. तसेच खैर प्रजातीच्या झाडापासून तयार केलेला कात माल हा वनोपज असल्याने त्यास वन विभागाकडून वाहतूक पास परवाना घेणे बंधनकारक आहे.

केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कात मालावर वस्तु व सेवाकर आकारला जातो.

(५) हे खरे आहे,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र दिनांक ०७.०२.२०२३ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सर्व काथ उद्योगांचे लेखी स्वरुपात म्हणणे प्राप्त करुन घेतले आहे. सदर लेखी निवेदनात काथ उद्योग हा वुडबेस इंडस्ट्री मधून वगळून ॲग्रो बेस्ड प्रकारात समावेश करणेबाबत नमूद करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाकडील राजपत्र दिनांक ११.११.२०१६ मधील नियम क्र.८ (vi) मध्ये विक्री/वारसाहक्क इत्यादीवरील परवाना हस्तांतरण राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेनेच केले जाईल असे निर्देश आहेत.

(६) केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचना दिनांक ११.११.२०१६ आणि दिनांक ११.०९.२०१७ रोजीच्या राजपत्रान्वये खैर प्रजातीच्या लाकडापासून कात निर्मिती ही बाब लाकडावर आधारीत उद्योगाच्या परिभाषेत मोडत असल्याने त्याकरीता गठीत राज्यस्तरीय समितीकडून सदर व्यवसाय करण्यासाठी पूर्व परवानगी घ्यावी असे निर्देश होते. त्याअनुषंगाने राज्यस्तरीय समितीने चिपळून व सावंतवाडी वनविभागातील एकूण १०२ कात उद्योगांना मंजूरी दिलेली आहे.

त्यानंतर राज्यस्तरीय समिती महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी मंजुरी दिलेल्या कात उद्योगांना या कार्यालयाचे स्तरावर नोंदणी करणे कामी नोंदणी प्रमाणपत्र आणि नोंदणी क्रमांक देण्यात आलेला आहे. कात उद्योग चालू करण्यासाठी कात उद्योगधारकांना परिमिटची आवश्यकता आहे यासाठी राज्यस्तरीय समितीने त्यांच्याकडील आदेशांन्वये आणि महाराष्ट्र वन नियमावली २०१४ मधील नियम क्रमांक ५५ अन्वये परमिट देण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांना प्रदान केलेले आहेत. त्यानुसार त्यांनी कात उद्योग सुरू करणे कामी परमिट दिलेले आहे.

तसेच कात या उद्योगास परवाना( परमिट) देणे करीता आरागिरणी प्रमाणे ऑनलाईन प्रणाली विकसीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत**

**(४९) ६३६६३ (२१-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत दोन विहिरींत असणाऱ्या अंतराची अट कमी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सादर अंतराची अट कमी केल्यामुळे दुष्काळी तालुक्यांमध्ये जलसिंचनाची जास्तीत जास्त सुविधा निर्माण होण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरी व शेततळे मिळणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना राबवण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना विभाग सक्षम असणे आवश्यक असुन या विभागात वारंवार होणारे संप व यंत्रणा समर्थ नसल्यामुळे अपेक्षित लाभ शेतकऱ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित केली तर योजनेचा लाभ अधिक शेतकऱ्यांना मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यानुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

खाजगी विहिरीपासून विहिरींचे अंतरासाठी, Run off Zone, अनुसूचित जाती व जमाती आणि दारिद्य रेषेखालील कुटुंब यांच्याकरिता १५० मी. अंतराची अट शिथील करण्यात आली आहे.

(२) फक्त सुरक्षित क्षेत्रात (Safe Zone) वैयक्तिक लाभाची सिंचन विहिरींची कामे हाती घेता येवू शकतात. शेततळ्यांसाठी अंतराची अट नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पलूस (जि. सांगली) येथील भूमापन कार्यालयातील अनागोंदी कारभाराबाबत**

**(५०) ६३९५५ (२१-०४-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस (जि. सांगली) तालुक्यातील भूमापन कार्यालयातून मोजणी करण्याचे काम वर्षभर प्रलंबित आहेत, तर जी मोजणी करण्यात आलेली आहेत, त्यांना हद्दी दाखविल्या जात नाहीत, त्यासाठी ड्रोनसर्व्हेचे कारण पुढे केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचप्रमाणे गेले ६ महिन्यांपासून ड्रोन सर्व्हे पूर्ण झाले असून येथील अधिकारी फिल्डवर असल्याचे कारण देऊन कार्यालयात नसतात त्यामुळे अनेक पक्षकारांची प्रकरणे प्रलंबित असून त्यांना कमी कर्मचारी कार्यरत असल्याचे कारण दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील प्रलंबित मोजणी प्रकरणे मार्गी लावण्यासह व तेथील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात उपस्थित राहून प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, पलूस या कार्यालयाकडे माहे मे २०२३ अखेर सर्व प्रकारचे एकूण १९७ मोजणी प्रकरणे शिल्लक आहेत. त्यामध्ये ६ महावरील १६ व १ वर्षावरील ०२ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. १ वर्षावर प्रलंबित असलेल्या सदर २ प्रकरणात अर्जदार यांनी वाढीव मुदत मागणी केलेली असलेने प्रलंबित आहे.

तसेच सांगली जिल्ह्यामध्ये एकूण ७३५ गावे असून त्यापैकी स्वामित्व योजनेपुर्वी २६३ गावांचा सिटी सर्व्हे झालेला आहे. उर्वरीत ४७२ गावांस महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण- २०१८/प्र.क्र.१३ दिनांक २२/०२/२०१९ अन्वये गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता देणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने पलूस तालुक्यातील एकूण १४ गावांचे काम ड्रोन सर्व्हेक्षणाद्वारे पुर्ण करणेत आलेले आहे. तसेच सांगली जिल्ह्यातील इतर तालुक्यातील गांवाचे ड्रोन द्वारे सर्व्हेक्षण झालेल्या गावचे नगर भूमापन हक्क चौकशीकामी सांगली जिल्ह्यातील सर्व अधिकारी यांची चौकशी अधिकारी व प्रत्येक तालुक्यातील एक कर्मचारी यांची सहाय्यक चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. तसेच दरमहा प्रत्येक कार्यालयास हक्क चौकशीकामी इतर तालुक्यातील गावे वितरीत करणेत आली आहेत व नियोजित तारखेस संबंधित अधिकारी हे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांसोबत चौकशी काम करतात.

(३) सदरबाबत अधिनस्त सर्व कार्यालय प्रमुख यांना जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली कार्यालयाकडून दरमहा ५ तारखेपूर्वी नियोजित दौरा कार्यक्रम मंजुरीस सादर करून मंजुर दौऱ्याची प्रत कार्यालयाचे नोटीस फलकावर प्रसिध्द करणेबाबत सक्त सूचना देणेत आल्या आहेत. तसेच प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करणेकामी भूकरमापक यांना ई. टी. एस. व रोव्हर मशिन पुरविण्यात आलेल्या आहेत. उप अधीक्षक भूमि अभिलेख, पलुस या कार्यालयातील तपासणी अंती प्रलंबित मोजणी आढावा घेऊन आवश्यक त्या नियमांतर्गत कार्यवाही अंती प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा उप अधीक्षक भूमि अभिलेख, पलूस कार्यालयाकडून करून घेणेची दक्षता घेतली आहे. तसेच भूमि अभिलेख विभागात कर्मचारी नव्याने भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून सांगली जिल्ह्यातील रिक्त पदे भरल्यानंतर प्रलंबित मोजणी प्रकरणे सत्वर निकाली करणे बाबतची कार्यवाही होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.